आरोग्य विभाग
जिल्हा परिषद, जळगांव

जि.प.नविन इमारत,तळमजला, जिल्हा परिषद,जळगांव ४२५००१
Email– dhozpjalgaon1@gmail.com दुरध्वनी क्र. ०२५७- २२२९५९३

जा.क्र.आरोग्य/आस्था-३/आरआर /१०७/२०२६ दिनांक :- २४/०६/२०२६

वाचा :-

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा (सेवा प्रवेश) नियम १९६७.
२. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग अधिसूचना दिनांक १७/१२/२०२५.
३. सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जळगाव यांचेकडील परिचर (वर्ग-४) संवर्गातून आरोग्य सेवक (पुरुष) या पदावर पदोन्नतीने निवड करण्यासाठी दिनांक २२/०६/२०२६ रोजी झालेल्या पदोन्नती निवड समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.
४. दिनांक २४/०६/२०२६ रोजी छत्रपती शाहू महाराज सभागृह, जिल्हा परिषद जळगाव येथे संपन्न झालेले समुपदेशन.

पदोन्नती आदेश :-

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट नऊ मधील नियम ५ व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग अधिसूचना दि. १७/१२/२०२५ मधील तरतुदींनुसार, जिल्हा परिषद जळगाव अधिनस्त कार्यरत परिचर (गट-ड / वर्ग-४) संवर्गातील कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवक (पुरुष) (गट-क) या पदावर सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्याची बाब प्रस्तावित होती. दिनांक २२/०६/२०२६ रोजी झालेल्या पदोन्नती निवड समितीच्या बैठकीमध्ये व शासन निर्णय दि. ०७/०५/२०२१ मधील तरतुदींनुसार आरक्षणरहित (बिंदूविरहित) सेवाज्येष्ठतेच्या स्थितीनुसार तात्पुरत्या स्वरूपात पात्र कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने दिनांक २४/०६/२०२६ रोजी झालेल्या समुपदेशनानंतर खालील तक्त्यात स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविलेल्या परिचर (गट-ड) कर्मचाऱ्यास **"आरोग्य सेवक (पुरुष) (गट-क)"** या पदावर सुधारीत वेतन संरचना एस-९ : २६४००-८३६०० या वेतनश्रेणीमध्ये मध्ये पदोन्नतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून पदोन्नती देण्यात येत आहे आणि त्यांना स्तंभ क्र. ७ मध्ये नमूद उपकेंद्र/प्राथमिक आरोग्य केंद्रात/कार्यालयात पदस्थापना देण्यात येत आहे.

अ. क्र.	सेवा ज्येष्ठता क्रमांक	परिचर कर्मचाऱ्याचे नाव	मूळ प्रवर्ग	पदोन्नतीचा प्रवर्ग	सद्याचे कार्यरत कार्यालय	पदोन्नतीनंतर पदस्थापनेचे ठिकाण (उपकेंद्र /प्रा.आ. केंद्र / तालुका)
१	२	३	४	५	६	७
१	५३	श्री. अनिल काशिनाथ पाटील	खुला	बिंदूविरहित	प्रा.आ.केंद्र साळवा, ता.धरणगाव	उपकेंद्र -साकरे प्रा.आ.केंद्र - नांदेड तालुका - धरणगांव
२	१३३	श्री. महेंद्र आत्माराम पाटील	खुला	बिंदूविरहित	पंचायत समिती धरणगाव	उपकेंद्र - सोनवद प्रा.आ.केंद्र - सोनवद तालुका - धरणगांव
३	१४२	श्री. राजु पांडुरंग महाजन	खुला	बिंदूविरहित	पंचायत समिती चाळीसगांव	उपकेंद्र - गणेशपुर प्रा.आ.केंद्र - तरवाडे तालुका - चाळीसगांव

Scanned with CamScanner

अ. क्र.	सेवा ज्येष्ठता क्रमांक	परिचर कर्मचाऱ्याचे नाव	मूळ प्रवर्ग	पदोन्नतीचा प्रवर्ग	सद्याचे कार्यरत कार्यालय	पदोन्नतीनंतर पदस्थापनेचे ठिकाण (उपकेंद्र /प्रा.आ. केंद्र / तालुका)
४	१६५	श्री. धनंजय हरिभाऊ आंधळे	भ.ज.-ड.	बिंदूविरहित	पशुवैदयकीय दवाखाना गोजोरा, ता.भुसावळ	उपकेंद्र - साकरी प्रा.आ.केंद्र - किन्ही तालुका — भुसावळ
५	१७०	श्री. महेश जगन्नाथ भारुळे	अनु. जाती	बिंदूविरहित	पशुवैदयकीय दवाखाना सुनसगाव, ता.भुसावळ	उपकेंद्र - शिंदी प्रा.आ.केंद्र - किन्ही तालुका - भुसावळ
६	१७४	श्री. विजय सुरेश चौधरी	स्वा. सै. पाल्य	बिंदूविरहित	पशुवैदयकीय दवाखाना सावदा, ता.रावेर	उपकेंद्र - ऐनपूर प्रा.आ.केंद्र - ऐनपूर तालुका - रावेर
७	२०४	श्री. प्रेमसिंग गलसिंग चव्हाण	वि.जा.अ.	बिंदूविरहित	प्रा.आ.केंद्र रांजणगाव ता.चाळीसगांव	उपकेंद्र - पाटणा प्रा.आ.केंद्र - रांजणगाव तालुका - चाळीसगांव.
८	२१८	श्री. सुरेश रघुनाथ संधाणे	अनु. जमाती	बिंदूविरहित	बांधकाम विभाग, जि.प.जळगाव	उपकेंद्र - नांद्रा बु. प्रा.आ.केंद्र - कानळदा तालुका - जळगाव.
९	२२५	श्री. सचिन कैलास पाटील	खुला	बिंदूविरहित	पशुवैदयकीय दवाखाना कंडारी, ता.जळगाव	उपकेंद्र - गोंडखेड प्रा.आ.केंद्र - वाकोद तालुका - जामनेर
१०	२२७	श्री. हसरत रौनक तडवी	अनु. जमाती	बिंदूविरहित	पशुवैदयकीय दवाखाना खिरोदा, ता.रावेर	उपकेंद्र - खिरोदा प्र.रा.१ प्रा.आ.केंद्र - ऐनपूर तालुका - रावेर
११	२२८	श्री. सरदार भारसिंग कनाशा	अनु. जमाती	बिंदूविरहित	प्रा.आ.केंद्र किनगाव, ता.यावल	उपकेंद्र - शिरसाड २ प्रा.आ.केंद्र - साकळी तालुका - यावल
१२	२३२	श्री. योगेश प्रकाश इंगळे	अनु. जाती	बिंदूविरहित	प्रा.आ.केंद्र येवती, ता.बोदवड	उपकेंद्र - बेटावद बु. प्रा.आ.केंद्र - बेटावद तालुका - जामनेर
१३	२३८	श्री. अय्युब अमीर तडवी	अनु. जमाती	बिंदूविरहित	पशुवैदयकीय दवाखाना कुसुंबा, ता.रावेर	उपकेंद्र - वाघोदा प्रा.आ.केंद्र - निंभोरा तालुका - रावेर
१४	२४६	श्री. खेमचंद सुरेश इंगळे	इमाव	बिंदूविरहित	पशुवैदयकीय दवाखाना कुंभारखेडा, ता.रावेर	उपकेंद्र - भालोद १ प्रा.आ.केंद्र - भालोद तालुका - यावल

Scanned with CamScanner

अ. क्र.	सेवा ज्येष्ठता क्रमांक	परिचर कर्मचाऱ्याचे नाव	मूळ प्रवर्ग	पदोन्नतीचा प्रवर्ग	सद्याचे कार्यरत कार्यालय	पदोन्नतीनंतर पदस्थापनेचे ठिकाण (उपकेंद्र /प्रा.आ. केंद्र / तालुका)
१५	२५२	श्री. संजय शशिकांत हिवरे	अनु. जाती	बिंदूविरहित	पंचायत समिती रावेर	उपकेंद्र - वाघोड प्रा.आ.केंद्र - वाघोड तालुका - रावेर
१६	२७४	श्री. मलक मुशीर मलक नजीर	खुला	बिंदूविरहित	पशुवैदयकीय दवाखाना विवरा, ता.रावेर	उपकेंद्र - वढोदा प्रा.आ.केंद्र - कु-हा तालुका - मुक्ताईनगर
१७	२७८	श्री. युवराज पोपट पाटील	इमाव	बिंदूविरहित	पंचायत समिती अमळनेर	उपकेंद्र - कु-हे प्रा.आ.केंद्र - ढेकु तालुका - अमळनेर
१८	२८५	श्री. दिनेश किसन नेहते	खुला	बिंदूविरहित	पशुवैदयकीय दवाखाना फैजपुर, ता.यावल	उपकेंद्र - कळमोदा प्रा.आ.केंद्र - खिरोदा तालुका - रावेर
१९	२९०	श्री. विजय चिंतामण पाटील	खुला	बिंदूविरहित	बांधकाम विभाग, जि.प.जळगाव	उपकेंद्र - बोरनार प्रा.आ.केंद्र - म्हसावद तालुका - जळगांव
२०	२९२	श्री. निलेश शिवाजी पाटील	खुला	बिंदूविरहित	पंचायत समिती चाळीसगांव	उपकेंद्र - बोळे प्रा.आ.केंद्र - तामसवाडी तालुका - पारोळा
२१	३०६	श्री. श्रीकृष्ण भगवान मोरे	खुला	बिंदूविरहित	प्रा.आ.केंद्र ढेकू, ता.अमळनेर	उपकेंद्र - गांधली प्रा.आ.केंद्र - ढेकु तालुका - अमळनेर
२२	३१२	श्री. राजेंद्र बाळकृष्ण पाटील	इमाव	बिंदूविरहित	साप्रवि विभाग, जि.प.जळगाव	उपकेंद्र - जळके १ प्रा.आ.केंद्र - म्हसावद तालुका - जळगांव
२३	३१६	श्री. दिपक भिमराव गढरी	भ.ज.-क	बिंदूविरहित	पंचायत समिती भडगाव	उपकेंद्र - टोणगाव १ प्रा.आ.केंद्र - गिरड तालुका - भडगांव
२४	३१८	श्री. महेश सतिष पाटील	खुला	बिंदूविरहित	प्रा.आ.केंद्र पातोंडा, ता.चाळीसगांव	उपकेंद्र — पातोंडा २ प्रा.आ.केंद्र — पातोंडा तालुका - चाळीसगांव
२५	३२५	श्री. महेंद्र प्रमोद वाघ	भ.ज.-ड	बिंदूविरहित	अर्थ विभाग, जि.प.जळगाव	उपकेंद्र - खर्ची २ प्रा.आ.केंद्र - रिंगणगाव तालुका - एरंडोल

पदोन्नतीच्या अटी व शर्ती:-

१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र. ३६६/१६- ब मंत्रालय मुंबई - ४०० ०३२ दिनांक ७ मे २०२१ नुसार मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णया अन्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले

Scanned with CamScanner

असेलेने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अदयाप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवा जेष्ठतेनुसार भरणेस निर्देश आहे. सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करणेबात निर्देश आहे. त्यानुसार सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवा जेष्ठता नुसार केव्हाही पूर्व पदावर आणण्यात येईल या अटीवर पदोन्नती देण्यात येत आहे.

२. पदोन्नती समितीच्या निर्णयानुसार ज्येष्ठता यादीतील वरील अ.क्र. १ (श्री. अनिल काशिनाथ पाटील), ६ (श्री. विजय सुरेश चौधरी), ११ (श्री. सरदार भारसिंग कनाशा), २० (श्री. निलेश शिवाजी पाटील) व २५ (श्री. महेंद्र प्रमोद वाघ) या कर्मचाऱ्यांना MS-CIT (संगणक अर्हता) प्रमाणपत्र हे सदर पदोन्नती आदेशाच्या दिनांकापासून १ वर्षाच्या आत कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. विहित मुदतीत प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांना मूळ 'परिचर' पदावर पदावनत करण्यात येईल.

३. पदोन्नत कर्मचाऱ्यांना शासनाच्या विभागीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र आणि सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर यांच्याकडून घेण्यात येणारा बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) किंवा शासनाने समकक्ष ठरवलेला इतर अभ्यासक्रम ३ संधींमध्ये यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

४. ज्या कर्मचाऱ्यांनी हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली नसेल किंवा सूट मिळालेली नसेल, त्यांनी शासनाच्या नियमांनुसार विहित मुदतीत सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

५. सदर आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत संबंधित कर्मचाऱ्याने पदोन्नतीच्या ठिकाणी रुजू व्हावे, अन्यथा त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल व ज्येष्ठतेवरील हक्क संपुष्टात येईल.

६. सदर पदोन्नती ही पूर्णत: तात्पुरती व अस्थायी स्वरुपाची असून केव्हाही पूर्व पदावर पदावनत करण्यात येईल अशी आहे.

७. सदर कर्मचा-याला महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) १९९३ च्या दुरुस्तीनुसार (१) च्या परंतु नुसार आपला वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याचे आत दयावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील निमय ११(१) च्या परंतुक (१) खाली केली जाईल.

८. संबधित कर्मचा-यांस नियुक्तीच्या ठिकाणी मुख्यालयी राहणे बंधनकारक राहील.

सदर आदेशाची नोद संबंधिताच्या मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.आदेशाचे शासन नियमानुसार काटेकोरपणे अमंलबजावणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा.

करिश्मा नायर (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव.

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना:

१) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद जळगाव

२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव.

३) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव.

४) गट विकास अधिकारी, पंचायत समिती _____ (सर्व संबंधित) - संबंधित कर्मचाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करून पोहच अहवाल सादर करावा.

५) तालुका आरोग्य अधिकारी, तालुका _____ (सर्व संबंधित).

६) वैदयकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र----------ता.---------- (सर्व संबंधित). संबंधित कर्मचाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करून पोहच अहवाल सादर करावा.

७) संबंधित कर्मचारी श्री. _____ (यांना कार्यालय प्रमुखांमार्फत).

Scanned with CamScanner